(महाराष्ट्र शासन)
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर
Govt. Dental College & Hospital, Chhatrapati Sambhajinagar
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दुरध्वनी: (0240) 2402381/82/83 संकेतस्थळ: www.gdchcsn.ac.in ईमेल: gdca83@yahoo.com

जा.क्र. शादंमरुछसं/खरेदी/रुग्णालयीन कपडे धुलाई/दरपत्रके/6150-52/2025 दि. 1 DEC 2025

दरपत्रक मागणीपत्र

प्रति,

-------------------------------

-------------------------------

विषय:- दरपत्रक मोहोदबंद लिफाफे सादर करणेबाबत.
<u>रुग्णालयीन कपडे धुलाई सेवा पुरवठादार नेमणेसाठी..</u>

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१७/०४/२०१५

२) उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उदयोग-४, दि. ०१ डिसेंबर, २०१६

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या अधिनस्त विभागांतील खालील विवरणाची मागणीनुसार व वेळोवेळी रुग्णालयीन कपडे धुलाईच्या अनुषंगाने सेवा पुरवठादार नेमण्यासाठी विहित पद्धतीने दरपत्रक प्रक्रिया करुन दरपत्रक मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारक या कार्यालयास रुग्णालयीन कपडे धुलाई सेवा दरपत्रकातील अटीं व शर्तीच्या अधिन राहुन पुरवठा करण्यास इच्छुक असल्यास आपला दरपत्रक मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत सादर करावा.

| अ.क्र. | कपडयांचा तपशिल | प्रति नगाच्या धुलाईसाठीचा दर सर्व करांसहित |
|---|---|---|
| १. | टॉवेल /सर्जिकल टॉवेल / नॅपकिन | |
| २. | दरवाजे पडदे | |
| ३. | खिडकी पडदे | |
| ४. | बेडशिट / ब्लॅंकेट | |
| ५. | टेबल क्लॉथ | |
| ६. | लंगु शर्ट / पॅंट | |
| ७. | कोट पायजमा | |
| ८. | गाऊन | |
| ९. | कॅप | |

<u>**महत्त्वाच्या अटीं व शर्ती:-**</u>

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दि.०९ डिसेंबर, २०२५ रोजी सायं.५.३० वाजेपर्यंत कार्यालयास पोहोचतील या बेताने पाठवावे, जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राह्य धरले जाणार नाही.

२) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा "**अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर**" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर "**रुग्णालयीन कपडे धुलाई सेवेसांठीचे दरपत्रक**", लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

३) प्राप्त झालेली दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याबाबतचा दिनांक आपणास यथावकाश कळविण्यात येईल. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

(मागे पहा...)

४) दरपत्रक ग्राह्य कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांकापासून सहा(६) महिन्यांचा राहिल.

५) प्रस्तावित सेवेसाठी दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे असेल, अश्याच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६) **दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्ताऐवज** (Documents):- जीएसटी(GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेड वर दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) दुकानाचा परवाना, (२)व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, (३) जीएसटी प्राधिकारपत्र, (४) पॅन कार्डची छायांकित प्रत, (५) अनुभव प्रमाणपत्र, (६) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र (सोबत प्रमाणपत्राची प्रत संलग्न)

७) **सेवा पुरवठ्याचा तपशील**:- सेवा पुरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून प्रत्येक आठवड्यातुन दोन वेळा प्रत्येक विभागातील जमा करण्यात आलेले रुग्णालयीन कपडे धुलाई करुन लगतच्या दिवशी संबंधित विभागास पोच करावे लागतील. विहित मुदतीत सेवा पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

८) **देयकाची अदायगी(PAYMENT)**:- संस्थेच्या अधिनस्त विभागांना आवश्यक ती रुग्णालयीन कपडे धुलाईची सेवा विहित वेळेत व उच्च दर्जाची उपलब्ध करुन दिल्याचे, संबंधित विभागप्रमुख यांनी प्रमाणित करुन दिल्यानंतर तसेच अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. यशस्वी दरपत्रकधारकास आगाऊ रक्कम(Advance Payment) अदा करण्यात येणार नाही, अपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही, याप्रकारची कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही.

९) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीं व शर्तींत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारणे/नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर दरपत्रक प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख(अधिष्ठाता) निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**(डॉ. मा.सं. इंदूरकर)**
अधिष्ठाता
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रत:- मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव.
प्रत:- संस्थेचे सुचनाफलक/संकेतस्थळ (जाहिर नोटीस), शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर
प्रत:- भांडार विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

# दरपत्रकधारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड

Letter No.

Date:-

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

विषयः- दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत.
(अट क्र. ६ मधील दस्ताऐवज क्र. ६ प्रमाणे)

संदर्भः- आपले दरपत्रक मागणीपत्र
क्रमांक ------------------------------------
दिनांक ------------------------------------

महोदय,

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटीं व शर्तीं मी वाचुन दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेसाठी सादर करीत आहे. सर्व अटीं व शर्तीं मान्य असून तद्संबंधीचे हमीपत्र खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (UNDERTAKING)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक मागणीपत्रात नमुद असलेल्या सर्व अटीं व शर्तीं मान्य असून, त्यांचे तंतोतत पालन करण्यात येईल. तसेच दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करित आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अशाप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेले नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिका-यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करण्यात आलेली सुपुर्ण माहिती, दस्ताऐवज व इतर सर्व अत्यावश्यक कागदपत्रे भविष्यात असत्य/बनावट/अवैध असल्याचे आढळून आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहिल, नियमानुसार होणा-या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू, तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही, अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व
स्वाक्षरी, फर्मचा शिक्का